महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com

जळगाव, धुळे, नंदुरबार | शुक्रवार , दि. २० मार्च २०२६ | वर्ष २ रे | अंक १२८ किंमत : ५ रु. | पाने ४


**दिन विशेष...**

१७२७ : थोर गणितशास्त्रज्ञ आयझॅक न्युटन यांचे निधन.
१९२२ : थोर नाटककार वसंत कानेटकर यांचा जन्म.
१९२७ : डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली महाडच्या चवदार तळ्यावरील सत्याग्रह.
१९५६ : कवी बाळ सीताराम मर्ढेकर यांचे निधन.

| सेन्सेक्स | ७४,२०७.२४ | -२,४९६.८९ (३.२६%) |
|---|---|---|
| डॉलर | ₹ ९३.२७ | |

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३६ | १९ |
| दिल्ली | २७ | १७ |
| मुंबई | ३१ | २३ |
| नागपूर | ३६ | २१ |
| पुणे | ३३ | १५ |

**सुविचार**

स्वप्न पाहणे ही जीवनाची सुंदरता आहे. प्रत्येक स्वप्न हे आपल्याला एक नवीन दिशा दाखवते.

| सूर्योदय | सूर्यास्त |
|---|---|
| स.-६:३२ | संध्या-६:३९ |


**सोने – चांदी**

| सोने(१० ग्रॅम) | चांदी (प्रति किलो) |
|---|---|
| १,५१,७३०/- | २,६०,०००/- |

# हिंदू विचारधारेच्या आधारावरच भारताची निर्मिती

## नितीन गडकरींचं विधान; जातीयतेचाही केला उल्लेख!

वृत्तसंस्था । नागपूर



**केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे स्पष्ट बोलण्यासाठी प्रसिद्ध आहेत. नागपूरमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संघचालक मोहन भागवत यांच्या उपस्थितीत झालेल्या एका कार्यक्रमात नितीन गडकरी यांनी गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर संघ स्थापनेची माहिती देताना मोठे विधान केले आहे.**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना करण्यामागे डॉक्टर हेडगेवार यांचा एक उद्देश होता. भारत एक समृद्ध राष्ट्र असताना व्यापार करण्याकरता आलेल्या इंग्रजांनी आपल्या देशावर युनियन जॅक फडकावला याचे कारण काय हे हेडगेवार यांनी शोधले. याचे चिंतन केल्यानंतर या देशाला संघटित केले पाहिजे हा विचार हेडगेवार यांनी केला. भारतीय विचाराच्या आधारावर भारतीय तत्व हेच राष्ट्रीयत्व आहे आणि राष्ट्रीयत्व हेच हिंदुत्व आहे. हिंदू इतिहास, संस्कृती आणि विचारधारा याच्या आधारावर भविष्यातील राष्ट्राची निर्मिती होणार असे गडकरी म्हणाले.

**प्रसारमाध्यमे लोकशाहीचा आधार**

प्रसारमाध्यमे हे लोकशाहीचे एक महत्त्वाचा पर्याय आहे. लोकांपर्यंत विचार पोहोचवणे राष्ट्राचा संदेश देण्यासाठी आणि बाळासाहेबांपासून तर विलास डांगेपर्यंत जे अध्यक्ष होते, संचालक (पान २ वर)

**➤ तर जातीयता अस्पृश्यता**

**आपल्या देशाला विश्वरूप बनवायचं असेल तर, जगातली तिसरी अर्थव्यवस्था बनवायचं असेल, तर राष्ट्रवादाच्या बरोबर सामाजिक आर्थिक सुधारणा करून जातीयता, अस्पृश्यता सामाजिक विषमता यातून मुक्त करून आपल्याला आर्थिक विकासाचाही मजबूत पाया निर्माण केला पाहिजे, असेही गडकरी म्हणाले.**

# नंदुरबारला ३ महिन्यांनंतर मिळाले पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्याकडे सोपवली जबाबदारी

प्रतिनिधी । नंदुरबार



**जिल्ह्याला नवीन पालकमंत्री मिळाले आहेत. राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्याकडे नंदुरबार जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.**

माजी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्यानंतर हे पद रिक्त होते आणि आता राष्ट्रवादी काँग्रेसकडे (अजित पवार गट) पुन्हा हे पद परत आले आहे. राज्य शासनाने याबाबत अधिकृत परिपत्रक जारी करून ही नियुक्ती जाहीर केली आहे.

**माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्यामुळे पद रिक्त**

पूर्वी नंदुरबार जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून माणिकराव कोकाटे हे कार्यरत होते. मात्र, शासकीय सदनिका लाटल्याच्या प्रकरणात दोषी ठरल्यानंतर त्यांना मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. यामुळे डिसेंबर २०२५ पासून नंदुरबारचे पालकमंत्रिपद रिक्त राहिले होते. या कालावधीत जिल्ह्यातील विकास कामे आणि प्रशासकीय बाबींवर परिणाम होत होता. आता ही रिक्तता भरून काढण्यात आली असून, हसन मुश्रीफ यांना ही अतिरिक्त जबाबदारी देण्यात आली आहे.

**हसन मुश्रीफ यांच्याकडे आता दोन जिल्ह्यांची जबाबदारी**

हसन मुश्रीफ यांच्याकडे आधीच सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्रिपद आहे. आता त्यांच्याकडे सोलापूरसह नंदुरबार जिल्ह्याचीही जबाबदारी येऊन मिळाली आहे.

## थोडक्यात

### केंद्रात शिंदे सेनेला दोन मंत्रीपदं मिळणार?

**मुंबई ।** नुकत्याच १० राज्यातील ३७ जागांसाठी राज्यसभा निवडणुका पार पडल्या. यामध्ये महाराष्ट्रातील सात खासदारांचा समावेश आहे. या निवडणुकीनंतर राज्याच्या राजकारणात मोठी घडामोड घडण्याची शक्यता आहे. केंद्रीय मंत्रिमंडळात मोठे फेरबदल होऊ शकतात, अशी दाट शक्यता वर्तवली जात आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला केंद्रात २ मंत्रीपदे मिळणार असल्याची शक्यता आहे.

### ईदनिमित्त तीन दिवसांच्या युद्धविरामाची घोषणा

**मुंबई ।** 'पवित्र ईद-उल-फित्र' सणाच्या पार्श्वभूमीवर दक्षिण आशियातील तणावपूर्ण सीमाभागात शांततेची चिन्हे दिसत आहेत. पाकिस्तानमध्ये प्रतिबंधित असलेल्या 'तहरीक-ए-तालिबान पाकिस्तान' (टीटीपी) या दहशतवादी संघटनेने गुरुवारी पहाटे तीन दिवसांच्या युद्धविरामाची घोषणा केली. याआधी बुधवारीच पाकिस्तान आणि अफगाणिस्तानच्या सैन्यानेही तात्पुरती शस्त्रसंधी जाहीर केली होती.

# केळीचे भाव मुद्दाम कमी करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कडक कारवाई करणार : केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान



प्रतिनिधी । जळगाव

**जिल्ह्यातील अमळनेरमध्ये अक्षय कृषी परिवार आणि मंगळग्रह सेवा संस्थेच्या संयुक्त विद्यमाने भूमी सुपोषण व संवर्धन राष्ट्रीय अभियानाची सुरुवात गुरुवारी केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या उपस्थितीत झाली. यानिमित्त जिल्ह्याच्या दौऱ्यावर असलेले कृषिमंत्री चौहान यांनी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात केळी उत्पादक शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. तसेच काही महत्वपूर्ण घोषणा त्यांनी याप्रसंगी केल्या.**

खरा कृषिमंत्री तोच आहे, जो शेताच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधतो. आणि त्यांच्या अडचणी समजून घेतो. त्यानुसार आपण जळगाव जिल्ह्यातील केळी उत्पादकांशी संवाद साधण्यासाठी आल्याची माहिती केंद्रीय कृषिमंत्री चौहान यांनी शेतकऱ्यांशी वार्तालाप केल्यानंतर पत्रकारांना दिली.

यावेळी केंद्रीय क्रीडा व युवक कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे, खासदार स्मिता वाघ, राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, आमदार अमोल जावळे, जिल्हाधिकारी रोहन घुगे, जिल्हा कृषी अधीक्षक कुरबान तडवी आदी उपस्थित होते. केळी समूह विकास केंद्रासाठी (बनाना क्लस्टर) सुमारे २०० कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. केळी लागवडीपासून ते काढणी पश्चात तंत्रज्ञान, कीड व रोग नियंत्रण, प्रक्रिया उद्योग, निर्यात सुविधा, पिकवण कक्ष आणि शीतगृहे यांचा लाभ शेतकऱ्यांना क्लस्टरच्या माध्यमातून मिळू शकेल. या प्रकल्पाची निविदा प्रक्रिया (पान २ वर)

# पुन्हा कोरोनासारखी परिस्थिती?

# गॅस सिलिंडर टंचाईमुळे कामगारांचे पलायन




वृत्तसंस्था । सुरत

कोरोना काळात लॉकडाऊनमुळे देशभरातून कामगार विस्थापित झाले होते. मुंबई आणि इतर प्रमुख शहरांतून हजारोंच्या संख्येने कामगार पायी चालत किंवा मिळेत त्या वाहनातून गावाकडे गेले. सध्या इराण-इस्रायल युद्धामुळे सुरतमधील कामगारांवर पुन्हा अशीच वेळ आली आहे. एलपीजी गॅस सिलिंडरचा तुटवडा भासत असल्यामुळे कामगारांना पुन्हा गावाची वाट धरावी लागत आहे. गुजरातच्या सूरत येथे मोठ्या प्रमाणात टेक्स्टाईल कारखाने आहेत. उत्तरेतील राज्यातून असंख्य कामगार याठिकाणी रोजगारासाठी आलेले आहेत. मात्र एलपीजी सिलिंडरचा खर्च परवडत नसल्यामुळे आता अनेकजण पुन्हा गावी जात आहेत.


उधना जंक्शन येथील रेल्वे स्थानकावर गेल्या काही दिवसांपासून स्थलांतरित मजुरांच्या रांगा दिसत आहेत. कामगार आपापल्या गावी जाण्यासाठी स्थानकावर गर्दी करत आहेत. डायिंग आणि प्रिंटिंग मिलमध्ये काम करणारे सुभाष ठाकूर हे पत्नी आणि दोन मुलांसह गावी जाण्यासाठी रेल्वे स्थानकावर आले असताना त्यांनी द इंडियन एक्सप्रेसशी बोलताना गॅस सिलिंडरमुळे आपल्याला कोणत्या अडचणींचा सामना करावा लागतो, याची कहाणी सांगितली.

**➤ सुरत येथे एका भाड्याच्या घरात राहून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या ठाकूर यांना एलपीजी गॅस सिलिंडर भरण्याचा खर्च परवडत नाही. लखनौ येथे पुन्हा जाण्यासाठी ट्रेनची वाट पाहणाऱ्या ठाकूर यांनी सांगितले की, माझ्याकडे गॅस नोंदणी नाही. त्यामुळे आम्ही पांदेसरा येथून पाच किलोचा छोटा सिलिंडर रिफिलिंग सेंटरमधून ५०० रुपयांमध्ये भरून घ्यायचो. या दुकानाने आता २५०० रुपयांपर्यंत रिफिलिंग दर वाढवले आहेत. एवढा खर्च आम्हाला परवडत नाही. त्यामुळे मी कुटुंबासह गावी जाण्याचा निर्णय घेतला.**

उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड आणि ओडिशामधील अनेक कामगारांनी रिव्हर्स मायग्रेशन (पुन्हा गावाकडे स्थलांतर) केल्यामुळे सुरतमधील वस्त्रोद्योगासमोर संकट उभे राहिले आहे. मनुष्यबळाच्या कमतरतेचा सामना करण्यासाठी अनेक कारखाने आठवड्यातून एक-दोन दिवस बंदही ठेवावे लागत आहेत. वस्त्रोद्योगासमोरील संकटावर भाष्य करताना दक्षिण गुजरात वस्त्र प्रक्रिया संघटनेचे अध्यक्ष (पान २ वर)

# इंधनानंतर 'इंटरनेट' संकट ओढवणार

## इराणकडून समुद्राखालील केबल्स कापण्याचा धोका?



वृत्तसंस्था । वॉशिंग्टन

अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्ध सुरु होऊन तीन आठवडे व्हायला आले आहेत. दोन्हीकडून चर्चा करण्यास नकार दिला जात असल्याने हा संघर्ष थांबण्याचे अद्याप कोणतेही चिन्ह दिसत नाही. इराणने होर्मुझची सामुद्रधुनी बंद केल्याने जगाला होणाऱ्या इंधन आणि (पान २ वर)

**भारताला बसू शकतो सर्वाधिक फटका?**


**तज्ज्ञांनी व्यक्त केलेल्या अंदाजानुसार, जर समुद्रातील या केबल्सना हानी पोहोचली, तर त्याचा फटका केवळ फोन किंवा वेबसाइट्स यांनाच नव्हे, तर बँकिंग, शेअर बाजार, रुग्णालयांना बसू शकतो. तसेच यंत्रणाही ठप्प होऊ शकतात. गल्फ देशांना याचा पहिला फटका बसेल, पण भारतालाही मोठ्याप्रमाणात इंटरनेट स्लोडाउनचा सामना करावा लागू शकतो. कारण भारताचे अनेक आंतरराष्ट्रीय डेटा कनेक्शन याच मार्गांवर अवलंबून आहेत, अशी माहिती आहे.**

# धुळे जि.प.च्या प्रभारी अधीक्षकाला लाचप्रकरणी तीन वर्षे सक्तमजुरी

## १० हजारांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडले; साक्षी पुराव्याच्या आधारे न्यायालयाने ठरवले दोषी

प्रतिनिधी । धुळे

**जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागातील तत्कालीन प्रभारी कार्यालयीन अधीक्षक पंकज विक्रम पाटील याला लाच स्वीकारल्याप्रकरणी जिल्हा व सत्र न्यायालयाने दोषी ठरवत तीन वर्षे सक्तमजुरी आणि १० हजार रुपयांचा दंड अशी शिक्षा सुनावली. दंडाची रक्कम न भरल्यास तीन महिन्यांचा अतिरिक्त साधा कारावास भोगावा लागेल, असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे.**




या निकालामुळे शासकीय कार्यालयांतील भ्रष्टाचाराविरोधात कडक संदेश गेल्याची चर्चा आहे. प्रकरणानुसार, तक्रारदाराने शिंदखेडा तालुक्यातील विरदेल येथे अंगणवाडी इमारतीचे बांधकाम घेतले होते. हे काम निर्धारित वेळेत पूर्ण न झाल्याने संबंधित उपअभियंत्यांनी 'कारणे दाखवा' नोटीस बजावली होती. ही कारवाई मागे घेण्यासाठी आणि प्रकरण मिटवण्यासाठी प्रभारी कार्यालयीन अधीक्षक पाटील यांनी तक्रारदाराकडे दहा हजार रुपयांची लाच मागितल्याचा आरोप होता. तक्रारदाराने याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार नोंदवली. त्यानंतर १६ सप्टेंबर २०१६ रोजी सापळा रचण्यात आला आणि पाटील याला लाचेची रक्कम स्वीकारताना रंगेहथ पकडण्यात आले.

याप्रकरणी धुळे शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे तत्कालीन पोलिस निरीक्षक पवन देसले यांनी केला होता. तपास पूर्ण करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. एम. तापकीरे यांच्या न्यायालयात या खटल्याची सुनावणी झाली. सादर करण्यात आलेल्या साक्षी व पुराव्यांच्या आधारे न्यायालयाने आरोपी पाटील याला भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत दोषी ठरवले.

● या कारवाईत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलिस अधीक्षक भारत तांगडे, अपर पोलिस अधीक्षक माधव रेड्डी आणि सुनील दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी पोलिस उपअधीक्षक सचिन साळुंखे यांनी तपास प्रक्रियेवर देखरेख ठेवली. पैरवी अंमलदार प्रविण पाटील व सागर शिर्के यांनी न्यायालयीन कामकाजात सहाय्य केले. सरकार पक्षातर्फे जिल्हा सरकारी अभियोक्ता ॲड. देवेंद्रसिंह तवर आणि अजय सानप यांनी युक्तिवाद मांडला.

# दाऊदच्या मालमत्तेचा केंद्र सरकारकडून लिलाव

वृत्तसंस्था । नवी दिल्ली



**कुख्यात अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहीमच्या रत्नागिरी येथील वडिलोपार्जित जमिनीचा व्यवहार झाला आहे. दोन जणांनी दाऊदशी संबंधित जमीन विकत घेतली आहे. या जमिनींचा लिलाव वारंवार करण्यात आला होता. पण या जमिनीची खरेदी करण्यासाठी कुणीही तयार नव्हतं. आता अखेर दाऊदची वडिलोपार्जित जमीन विकली जाणार आहे. केंद्र सरकारने हा लिलाव आयोजित केला होता.**

५ मार्च २०२६ ला केंद्र सरकारने दाऊदच्या रत्नागिरी तालुक्यातील खेड येथील मुम्बके गावात असलेल्या जमिनीचा लिलाव आयोजित केला होता. चार भूखंडांसाठी हा लिलाव आयोजित करण्यात आला होता. हे भूखंड कुख्यात डॉन दाऊद इब्राहीमच्या कुटुंबाचे आहेत.

## संपादकीय

### युद्धाचा वणवा जलसाठ्यांकडे

इराणच्या अण्वस्त्रांवरून सुरू झालेला हा संघर्ष आता केवळ सीमेवरील चकमकींपर्यंत मर्यादित न राहता, मानवी अस्तित्वाचा पाया असलेल्या पाणीपुरवठा आणि त्याच्या सुरक्षा यंत्रणांच्या नाशापर्यंत पोहोचला आहे. इराणच्या परराष्ट्र मंत्र्यांनी नुकताच असा खळबळजनक आरोप केला आहे की, अमेरिकन हल्ल्यात होर्मुझ सामुद्रधुनीजवळील केशम बेटावर असलेले खारे पाणी गोड करण्याचे (डिसेलिनेशन) मुख्य संयंत्र पूर्णपणे उद्ध्वस्त झाले आहे. या एका हल्ल्याचा परिणाम इतका भीषण आहे की, परिसरातील सुमारे ३० गावांचा पाणीपुरवठा पूर्णपणे खंडित झाला. याला प्रत्युत्तर म्हणून इराणने बहरीनमधील जल शुद्धीकरण प्रकल्पांना लक्ष्य केल्यामुळे आता हे युद्ध तेल आणि लष्करी तळांच्या पलीकडे जाऊन थेट पाण्यावर येऊन ठेपले आहे. खाडी देशांमधील मोठी लोकसंख्या ही नैसर्गिक पाण्याच्या स्रोतांच्या अभावामुळे याच कृत्रिम प्रकल्पांवर अवलंबून आहे, त्यामुळे या केंद्रांना लक्ष्य करणे म्हणजे संपूर्ण नागरी वस्तीला मृत्यूच्या खाईत ढकलण्यासारखे आहे. पुढचे जागतिक युद्ध हे पाण्यासाठी होईल, असे म्हटले जाते. सध्या मध्य आशियामध्ये सुरू असलेली परिस्थिती पाहता हे आता प्रत्यक्षात उतरताना दिसत आहे. आखाती देशांनी आता आपल्या तेल विहिरींपेक्षा या जलसंयंत्रांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्यास सुरुवात केली असून या केंद्रांभोवती आधुनिक क्षेपणास्त्रे आणि ड्रोन तैनात करण्यात आले आहेत. या प्रकल्पांना होणारी थोडीशी इजा देखील संपूर्ण देशाचे जनजीवन विस्कळीत करण्यास पुरेशी आहे. विशेषतः बहरीन, कतार आणि कुवेत यांसारख्या देशांकडे पाण्याचे पर्यायी स्रोत अत्यंत कमी असल्याने त्यांना या युद्धाचा सर्वाधिक फटका बसण्याची शक्यता आहे. इराणसाठी हे युद्ध केवळ लष्करी नसून ते अस्तित्वाचे युद्ध बनले आहे. कारण, त्यांच्या स्वतःच्या जलसाठ्यांवरही मोठे संकट आले आहे. अमेरिकेने इराणची राजधानी तेहरानवर केलेल्या रासायनिक टॉक्सिक बॉम्बच्या हल्ल्यामुळे तिथली स्थिती अत्यंत भयावह झाली आहे. या हल्ल्यात तेहरानमधील ३० मोठे जलसाठे निकामी झाले असून हवेत विषारी धूर पसरला आहे. या प्रदूषणामुळे शहरात ॲसिड रेन म्हणजेच आम्ल पावसाची भीती निर्माण झाली आहे. नैसर्गिक जलाशयांच्या पृष्ठभागावर तेलाचा आणि रसायनांचा जाड थर जमा झाल्यामुळे ते पाणी पिण्यायोग्य राहिलेले नाही. या संकटामुळे तेहरानमधील सुमारे ९० लाख नागरिक पिण्याच्या पाण्यासाठी व्याकुळ झाले असून शहरात अघोषित संचारबंदी लागू करण्यात आली आहे. केवळ इराणच नाही, तर लेबनॉनमधील हिजबुल्लाच्या तळांवर देखील अशाच प्रकारचे टॉक्सिक बॉम्ब टाकले जात आहेत, जे पिकांचा नाश करण्यासोबतच जमिनीखालील पाण्याचे साठे कायमचे दूषित करत आहेत. सौदी अरेबिया, कुवेत, ओमान आणि कतार यांसारख्या देशांच्या अर्थव्यवस्थेचा कणा तेल असले तरी त्यांच्या अस्तित्वाचा आधार जल शुद्धीकरण संयंत्रे हाच आहे. या देशांतील ९० टक्के पिण्याचे पाणी समुद्राच्या खाऱ्या पाण्यावर प्रक्रिया करून मिळवले जाते. एका जुन्या अमेरिकन राजनैतिक दस्तऐवजात असा इशारा देण्यात आला होता की, जर सौदी अरेबियातील ङ्गजुबेलफजल केंद्राला किंवा तिथल्या पाइपलाइनला हानी पोहोचली, तर राजधानी रियाधला अवघ्या सात दिवसांत रिकामे करावे लागेल. यावरून या देशांची पाण्याची गरज आणि त्यांची हतबलता लक्षात येते. खाडी देशांनी आपल्या तलावांमध्ये आणि पाणीपुरवठा साखळीत मोठी गुंतवणूक केली असली तरी, युद्धाच्या काळात हे सर्व साठे असुरक्षित ठरत आहेत.या भीषण संकटाच्या काळात इस्रायलने मात्र जलव्यवस्थापनात स्वतःला जागतिक महाशक्ती म्हणून सिद्ध केले आहे.

# शेतकऱ्यांचे भले होत नसेल तर, नुकसान तरी करू नका!

## माजी आ. अनिल गोटे यांचा सल्ला; मनमाड–इंदूर रेल्वे मार्गावरील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचा मेळावा

प्रतिनिधी । धुळे



**मनमाड–इंदूर रेल्वे मार्गावरील शेतकऱ्यांचे दुर्दैव असून खासदार, आमदारांना प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या मागण्याच कळालेल्या नाहीत. पुढाऱ्यांनी अकलेचे तारे तोडू नये, हा प्रश्न नीट समजून घ्या! तुमच्याकडून शेतकऱ्यांचे भले होत नसेल तर, नुकसान तरी करू नका, असा सल्ला प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या मेळाव्यात शिवसेना नेते, माजी आमदार अनिल गोटे यांनी दिला.**

शेतकऱ्यांच्या नेमक्या कुठल्या मागण्या मिळाल्याशिवाय हा मार्ग होणार नाही, याचे विश्लेषण भाषणात कुठेही केलेले नाही. त्यांच्या भाषणाची सरकारने दखल सुद्धा घेतली नाही. ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. ज्या शेतकऱ्यांच्या शेतातून रेल्वे मार्ग जाणार आहे. त्या शेतकऱ्याला राष्ट्रीय महामार्गाच्या भुसंपादनात ज्या प्रमाणे नुकसान भरपाईप्रमाणे दिली. त्या प्रमाणे नुकसान भरपाई दिल्याशिवाय, त्यांचा प्रश्न सुटणार नाही. त्यांच्या घरामध्ये एक रोजगार मिळणे आवश्यक आहे. तसेच तत्कालीन प्रधानमंत्री स्वर्गीय अटल बिहारी वाजपेयी यांनी प्रत्येक शेतकऱ्याच्या घरात एक रोजगार देण्याचे मान्य केले होते.

जे शेतकरी भुमिहिन होत आहेत, त्या शेतकऱ्यांना, त्यांचे जेवढे क्षेत्र रेल्वे मार्गाखाली जाणार आहे. तेवढी जमिन मिळालीच पाहिजे अशी मागणी आहे. वनझाडे व फळझाडे यांचे दर मनमाड पासून इंदूर पर्यंत एकच असले पाहिजे. काही ठिकाणी भुसंपादन अधिकाऱ्यांनी प्रचंड भ्रष्टाचार करुन किंवा आमदार, खासदार, पुढाऱ्यांच्या नातेवाईकांना एका आंब्याच्या झाडाला ४६ हजार रुपये प्रतिझाड तर, अन्य ठिकाणी ४०० रुपये दर दिला आहे.

ही तफावत दूर करुन सर्व शेतकऱ्यांना एकच न्याय दिला पाहिजे. यासाठी शेतकरी स्वतः ची कैफियत वेळ मिळाल्यास पंतप्रधान, रेल्वे मंत्री, राहुल गांधी इत्यादी वरीष्ठ व अन्य नेत्यांकडे दिल्लीला जावून मांडणार आहे. बैठकीत अनिल पाटील सोनगीर, प्रशांत भदाणे नगांव, सेना नेते शानाभाऊ सोनवणे, देवाजी देवरे, आंदोलनाचे नेते शेखर पगार इत्यादींनी मते मांडली.

> **मनमाड-इंदूर रेल्वे मार्गाच्या निर्मितीचे काम वेगाने सुरू आहे. पण, शेतकऱ्यांना मिळणारा जमिनीचा मोबदला हा अत्यल्प असून, जोवर तुम्ही राष्ट्रीय महामार्गाला देतात, त्याच दराने रेल्वे मार्गाच्या जमि नींना नुकसान भरपाई मिळाली पाहिजे. रेडी रेकनरच्या चारपट किंवा सहापट दर मिळावा, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे. काल परवाच खासदारांनी लोकसभेत, मनमाड इंदूर रेल्वे मार्गाचा प्रश्न अत्यंत अपुऱ्या ज्ञानावर उपस्थित केला, असा आरोप माजी आ. गोटे यांनी केला. पण मूळ प्रश्नांचा अभ्यास न करता आणि शेतकऱ्यांशी चर्चा न करता, केलेले भाषण हे अतिशय हास्यास्पद आहे.**

## आयटीआयच्या विद्यार्थ्याची आत्महत्या

प्रतिनिधी । जळगाव

येथील शासकीय आयटीआयमध्ये शिक्षण घेणाऱ्या १८ वर्षीय विद्यार्थ्याने वसतिगृहात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. रोहित समाधान पवार (रा. निंभोरा, ता. धरणगाव) असे मृत विद्यार्थ्याचे नाव आहे. त्याने आत्महत्येपूर्वी इन्स्टाग्रामवर ठेवलेल्या स्टेटसमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. रोहित हा जळगाव येथील सामाजिक न्याय विभागाच्या शासकीय वसतिगृहात राहत होता. दि.१७ मार्च रोजी सकाळी त्याचे वडील त्याला भेटण्यासाठी वसतिगृहात आले होते. त्यावेळी पोटात दुखत असल्याने कॉलेजला गेलो नाही, असे सांगून त्याने वडिलांना निरोप दिला. मात्र, वडील गेल्यानंतर काही तासांतच रोहितने आपल्या खोलीत गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवली. दुपारी ३ वाजेच्या सुमारास त्याचा रूममेट सागर शिरोळे कॉलेजवरून परतला असता, हा प्रकार उघडकीस आला. त्याला तातडीने जिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

# सिलिंडर नोंदणी करताना ॲपमध्ये तांत्रिक अडचणींमुळे धुळ्यातील ग्राहक त्रस्त

प्रतिनिधी । धुळे



**शहरातील विविध पेट्रोलियम कंपन्यांच्या गॅस सिलिंडर नोंदणी प्रक्रियेत तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या असून, ग्राहकांना सिलिंडरची नोंदणी करतांना अनेक अडचणी येत आहेत. यामुळे धुळे शहरातील ग्राहक त्रस्त झाले असून, गॅस एजन्सींच्या बाहेर विनाकारण रांगा लागत आहेत.**

याबाबत संबंधित सर्व पेट्रोलियम कंपन्यांना त्यांच्या सिलिंडर नोंदणी ॲपसह सॉफ्टवेअरमध्ये तत्काळ सुधारणा करण्याचे तसेच गॅस सिलिंडरचा काळा बाजार रोखण्याचे शासनाने निर्देश द्यावेत, अशी मागणी आ. अनुप अग्रवाल यांनी आज विधिमंडळात औचित्याच्या मुद्याद्वारे केली.

### आ.अनुप अग्रवाल यांनी मांडला विधिमंडळात औचित्याचा मुद्दा

राज्य विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन मुंबईत सुरू असून, आज आ. अनुप अग्रवाल यांनी औचित्याच्या मुद्याद्वारे शहरातील गॅस ग्राहकांच्या समस्यांवर सभागृहात मांडला. आ. अग्रवाल म्हणाले, की धुळे शहरातील इंडियन ऑइल कंपनीसह अन्य कंपन्यांच्या गॅस ग्राहकांना घरगुती वापराचे सिलिंडर मिळविताना विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे. या कंपन्यांच्या गॅस सिलिंडर नोंदणीसाठीच्या ॲप व सॉफ्टवेअरमध्ये तांत्रिक अडचणी असून, ग्राहकांना नोंदणी करता येत नाही. अनेक ग्राहकांना सिलिंडर मिळण्यापासून वंचित राहावे लागत असून, गॅस एजन्सीसमोर ग्राहकांच्या नाहक रांगा लागत आहेत. सिलिंडर मिळत नसल्याने अनेकदा वादाचे प्रसंग उद्भवत आहे,असे आ. अग्रवाल यांनी सांगितले.

# पंतप्रधान आवास योजनेचा लाभार्थ्यांनी लाभ घ्यावा : आयुक्त

प्रतिनिधी । धुळे



पंतप्रधान आवास योजनेतील लाभार्थ्यांना घरकुलाचा त्वरीत लाभ मिळावा यासाठी बांधकाम परवानगी देणेकरीता या शिबीराचा आयोजन असून या शिबीराच्या माध्यमातून जास्तीत जास्त नागरीकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आज आयोजीत बांधकाम परवानगी शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी आयुक्त नितीन कापडणीस यांनी आवाहन केले.

दि. १७ मार्च रोजी धुळे महापालिकेमार्फत पंतप्रधान आवास योजनेतील लाभार्थ्यांना एकाचवेळी व एकाच ठिकाणी बांधकाम परवानगी देण्यासाठी या शिबीराचे आयोजन आयुक्त नितीन कापडणीस यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. शिबिराचे उदघाटन उपस्थित लाभार्थ्यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले. पंतप्रधान शहरी आवास योजना २.० अंतर्गत आजतागायत ३७४ लाभार्थी निश्चीत झालेले आहेत. त्यापैकी सुमारे २१३ लाभार्थ्यांनी बांधकाम परवानगी न घेतल्याने सदर योजनेचा लाभ देण्याबाबत अडचणी येत होत्या यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आलेले होते. आज झालेल्या शिबिराप्रसंगी एकूण १९० लाभार्थ्यांपैकी एकूण ११९ लाभार्थ्याना कागदपत्रांची पडताळणी करुन बांधकाम परवानगी प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. तसेच उर्वरीत लाभार्थ्यांना कागदपत्रांमधील त्रुटीची पूर्तता करुन बांधकाम प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. यावेळी अति. आयुक्त करुणा डहाळे, सहा. संचालक नगररचना भटू पवार, उपायुक्त मनोज वाघ, शहर अभियंता चंद्रकांत उगले, उपअभियंता कमलेश सोनवणे, प्रकाश सोनवणे उपस्थित होते.

## पान १ वरुन

### हिंदू विचारधारेच्या......

होते. त्यांचे मोठे योगदान आहे. आणि त्यामुळे या सर्व संचालकांना जास्त काम करत आहेत. त्यांना शंभर वर्षाच्या निमित्ताने मी खूप खूप शुभेच्छा देतो. आणि हे कार्य निश्चितपणे असंच पुढे चालत राहील असा विश्वास व्यक्त करतो. आज आपल्या समाजामध्ये सुरुवातीच्या काळामध्ये साधे त्याच्या नंतर विचार भिन्नता ही समस्या होती. आज हळूहळू विचार भिन्न तेच रूपांतर विचार शून्यते मध्ये होत आहे. त्यामुळे समाजाचे वैचारिक प्रबोधन शिक्षण आणि संस्कार हे केल्याशिवाय योग्य व्यक्तींचा निर्माण होऊ शकत नाही. आणि ते निर्माण झाल्याशिवाय सामाजिक आर्थिक परिवर्तनाबरोबर राष्ट्रीय निर्माण देखील होऊ शकत नाही. विचाराची प्रतिबद्धता ठेवणं आणि त्यात व्यावसायिक यश मिळवणं या तिन्ही गोष्टी एकत्र काही नांदत नाही. आणि त्यामुळे मधल्या काळामध्ये आर्थिकदृष्ट्या अडचणी होत्या. पण मी आदरणीय डॉक्टर विलास डांगरे अनिल दांडेकर आणि विशेषता प्रबंध संचालक धनंजय बापट यांना मनापासून धन्यवाद देतो की, त्यांनी आर्थिक दृष्ट्या देखील आज सक्षम करून दाखवले आहे.

### पुन्हा कोरोनासारखी परिस्थिती?......

जितुभाई वखारिया प्रसिद्धी माध्यमांशी बोलताना म्हणाले, 'एलपीजीच्या संकटामुळे कामगारांची परिस्थिती बिकट झाली आहे. अनेकांकडे एलपीजी सिलिंडरची नोंदणी नाही. ते भाड्याच्या घरात राहतात. कामगार गेल्यामुळे काही गिरण्या आठवड्यातून एक-दोन दिवस बंद कराव्या लागत आहेत. नवरात्र आणि लग्नसराई जवळ आल्यामुळे कारखाने सुरू राहावेत, याचा कसाबसा प्रयत्न आम्ही करत आहोत'.जितुभाई वखारिया पुढे म्हणाले, एलपीजीच्या संकटावर मात करण्यासाठी आम्ही पांदेसरा भागात एक सामुदायिक स्वयंपाकघर सुरू केले आहे. याठिकाणी कामगारांना स्वस्त दरात जेवण उपलब्ध करून दिले जात आहे. एका थाळीचा दर ४० ते ४५ रुपये आहे. गिरणी कामगार याठिकणाहून जेवण विकत घेऊन सायंकाळी कामगारांना पुरवतात. जेणेकरून ते दुसऱ्या दिवशी पुन्हा एकदा कामावर परत येतील. या स्वयंपाकघराद्वारे दररोज ५००० लोकांसाठी अन्न तयार केले जात आहे.

### इंधनानंतर 'इंटरनेट'......

गॅस पुरवठ्यावर गंभीर परिणाम झाला आहे. तिसऱ्या आठवड्यात या संघर्षाने अधिक भीषण घेतले असून, गॅस आणि तेल साठ्यांना लक्ष केले जात आहे. अशात इराण होर्मुझमधून जाणाऱ्या केबल्स कापून जगाचा डिजिटल संपर्क तोडणार का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. होर्मुझ आणि रेड सीमधील बाब अल मंदेब मार्ग – होर्मुझ सामुद्रधुनीतून जगातील २० टक्के तेल आणि गॅस वाहतूक होते, याशिवाय डिजिटल नेटवर्कसाठी देखील हा मार्ग अत्यंत महत्वाचा मानला जातो. होर्मुझ आणि रेड सीमधील बाब अल मंदेब हे दोन्ही सागरी मार्ग डिजिटल रक्तवाहिन्या मानले जातात, कारण याच मार्गांवरून समुद्राखालून जाणाऱ्या फायबर-ऑप्टिक केबल्सचे जाळे पसरलेले आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीत इराणने समुद्री सुरुंग पेरल्याने हा मार्ग वाहतुकीसाठी बंज आहे. तर, लाल समुद्रातील बाब अल मंदेब मार्गवर इराण समर्थक हुथी बंडखोर हल्ला करण्याची भीती व्यक्त केली जात आहे. लाल समुद्रातून १७ महत्वाच्या समुद्री केबल्स जातात. या केबल्स आशिया आणि आफ्रिकेला इंटरनेटने जोडतात.

### . केळीचे भाव मुद्दाम कमी......

पूर्ण झाली आहे. प्रकल्पाच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र शासन पुढाकार घेईल, असे कृषिमंत्री चौहान यांनी नमूद केले. केळी क्लस्टर अंमलबजावणीत अडचण – जळगाव येथील केळी संशोधन केंद्राला आगामी काळात आणखी बळकटी देण्यात येईल. आखाती देशांमधील तणावामुळे सध्या निर्यातीच परिस्थिती बिकट झाली असून, त्याचा मोठा फटका केळी उत्पादकांना बसला आहे. त्यावर शक्य तितक्या लवकर मार्ग काढून शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला जाईल. मुद्दाम भाव कमी करणाऱ्या केळी व्यापाऱ्यांवर यापुढील काळात कडक कारवाई केली जाईल, असेही केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी नमूद केले. दरम्यान, केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे केळी क्लस्टरच्या अंमलबजावणीतील अडचणी मांडल्या. क्लस्टरच्या लाभासाठी राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाकडून काही महिन्यांपूर्वी इच्छुक शेतकरी उत्पादक कंपन्या तसेच शेतकऱ्यांसाठी काम करणाऱ्या संस्थाकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. प्रत्यक्षात, केळी क्लस्टरच्या लाभासाठी असलेल्या भांडवलाच्या अटीमुळे खूपच कमी प्रतिसाद मिळाल्या त्या म्हणाल्या.

# चैत्र पालवी स्वरोत्सवात संगीताच्या सुरेल मैफलीचा लुटला आनंद

प्रतिनिधी । जळगाव

**गुढीपाडवा आणि मराठी नववर्षाच्या स्वागतानिमित्त जळगावातील महात्मा गांधी उद्यान येथे चैत्र पालवी स्वरोत्सव या संगीतमय कार्यक्रम पार पडला. स्वर्गीय वसंतराव चांदोरकर स्मृती प्रतिष्ठानच्या आयोजित कार्यक्रमाला रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.**

कार्यक्रमाचे उद्घाटन महापौर दीपमाला काळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. विवेकानंद कुलकर्णी आणि विश्वस्त दीपक चांदोरकर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच गुढीपाडव्याच्या पारंपरिक उत्साहात संगीताचा रंग भरत वातावरण भारावून गेले. गायक वरुण नेवे आणि गायिका श्रुती जोशी यांनी सादर केलेल्या भावभक्तीपर आणि मराठी गीतांनी रसिकांची मने जिंकली. त्यांच्या सुरेल गायनामुळे संपूर्ण परिसरात एक वेगळीच सांगीतिक ऊर्जा निर्माण झाली. यासोबतच राजश्री रत्नपारखी यांनी सादर केलेल्या बासरी वादनाने मंत्रमुग्ध केले आणि कार्यक्रमाला एक वेगळेच सौंदर्य प्राप्त झाले. कार्यक्रमात संवादिनीवर राजेंद्र माने आणि तबल्यावर राहुल कासार यांनी उत्कृष्ट साथसंगत दिली. सूत्रसंचालन प्रीती झारे यांनी केले, तर आभार नुपूर खटावकर चांदोरकर यांनी मानले.

# गॅस सिलिंडरची दरवाढ रद्द करा: बिरसा फायटर्सची मागणी

प्रतिनिधी । राणीपुर



**गॅस सिलिंडरच्या किंमतीत केलेली दरवाढ तात्काळ रद्द करण्यात यावी, अशी मागणी बिरसा फायटर्स संघटनेकडून केंद्रीय पेट्रोलियम व प्राकृतिक गॅस मंत्री हरपितसिंह पुरी व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.**

निवेदनात म्हटले आहे, मार्चमध्ये घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या दरात जी वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे गॅस सिलिंडर दर वाढला असून व्यवसायिक गॅस सिलिंडर देखील महाग झाला आहे. युद्धामुळे गॅस सिलिंडरच्या दरात केंद्र सरकारने अचानकपणे वाढ केलेली आहे.

या दरवाढीचा फटका सर्वसामान्यांना व व्यावसायिकांना बसला आहे. गॅस सिलिंडरच्या दर वाढीमुळे सर्वसामान्य माणसांच्या घरात पुर्वीसारखे चुलीवर जेवण बनवायला सुरुवात झाली असून गॅस गायब होत आहेत व व्यावसायिक सिलिंडर मिळत नसल्यामुळे छोटे व्यावसाय, हॉटेल्स, खानावळी बंद कराव्या लागत आहेत. एकीकडे सरकार लाडकी बहिण योजनेतून पैसे महिलांना देऊन दिंडोरा पिटत आहे, तर दुसरीकडे घरगुती गॅस सिलिंडर दरवाढ करून लाडक्या बहिणीला पुन्हा चुलीवर जेवण बनवायला लावून रडवत आहे. गॅस सिलिंडरच्या दरवाढीमुळे महिला, सर्व सामान्य व व्यावसायिकांमध्ये सरकार विरोधात नाराजी निर्माण झाली आहे.

सर्वसामान्य जनता गॅस सिलिंडरच्या दरवाढीविरोधात आक्रोश व्यक्त करत आहेत. गॅस सिलिंडरच्या किमतीत केलेली दरवाढ तात्काळ रद्द करण्यात यावी; अन्यथा सरकारच्या या गॅस सिलिंडरच्या दरवाढीविरोधात संघटनेकडून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा बिरसा फायटर्स संघटनेने सरकारला दिलेला आहे.

# धडगाव येथे व्यावसायिक शिक्षण, उद्योजकता विषयावर कार्यशाळा

प्रतिनिधी । धडगाव

**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था नंदुरबार व पंचायत समिति शिक्षण विभाग धडगाव यांच्या संयुक्त विद्यमाने व्यावसायिक शिक्षण व उद्योजकता या विषयावर मुख्याध्यापक व शिक्षकांसाठी तालुकास्तरीय दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली. ही कार्यशाळा निगदी माध्यमिक विद्यालय, धडगाव येथे पार पडली.**

कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी गटशिक्षणाधिकारी डी.डी.राजपूत व शिक्षण विस्तार अधिकारी दीपाली बारी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० अंतर्गत शालेयस्तरावर व्यावसायिक शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट करत विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य विकास, स्वावलंबन व उद्योजकतेची भावना निर्माण करण्यासाठी शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगितले. या प्रशिक्षण कार्यशाळेत व्यावसायिक शिक्षणाची संकल्पना, उद्योजकतेचे महत्त्व, विद्यार्थ्यांमध्ये कौशल्याधारित शिक्षणाची अंमलबजावणी कशी करावी, तसेच शाळा स्तरावर विविध उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना उद्योजकतेकडे कसे प्रवृत्त करावे याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. प्रशिक्षणादरम्यान विविध गटचर्चा, उदाहरणे आणि प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून शिक्षकांना माहिती देण्यात आली.

या कार्यशाळेस भरत शिंदे व मिलिंद माणिक यांनी प्रशिक्षणार्थी शिक्षकांना मार्गदर्शन केले. त्यांनी व्यावसायिक शिक्षणाची अंमलबजावणी करताना शिक्षकांनी कोणत्या बाबींची काळजी घ्यावी, तसेच विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी विविध उपक्रम कसे राबवावेत याबाबत सविस्तर माहिती दिली.

या प्रशिक्षणात धडगाव तालुक्यातील सुमारे ३५ माध्यमिक शाळांमधील शिक्षकांनी प्रशिक्षणामुळे शिक्षकांना व्यावसायिक शिक्षणाच्या अंमलबजावणीबाबत मार्गदर्शन मिळाले असून विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेची जाणीव निर्माण करण्यासाठी हे प्रशिक्षण उपयुक्त ठरणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. विद्यार्थ्यांनी देखील सहभाग नोंदवला.

# पाष्टे येथे आरोग्य तपासणी

प्रतिनिधी । बेटावद

छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियान निमित्ताने शिंदखेडा तालुक्यात विविध उपक्रम राबवले जात आहेत याच अभियानाचा एक भाग म्हणून, प्राथमिक आरोग्य केंद्र बेटावद अंतर्गत पाष्टे येथे आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरात ग्रामस्थांची आरोग्य तपासणी करून त्यांना आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन व संदर्भ सेवा देण्यात आल्या. या शिबिरात मधुमेह, रक्तदाब, कॅन्सर, स्ट्रोक, अस्थमा यांचे निदान करून संदर्भ सेवा देण्यात आली. यावेळी समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्यासहायक आरोग्यसेवक, आरोग्यसेविका, आशा कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक – सागर काशिनाथ ओतारी (मोबा.– ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी –३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव –४२५००१ येथे छापून शॉप नं. ई–१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव– ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
* कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी (* पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७–२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# गुढीपाडव्याला सोने, चांदी खरेदीसाठी उसळी गर्दी

## दर कोसळले जळगावमध्ये ग्राहकांच्या उत्साहाला उधाण

प्रतिनिधी । जळगाव

**साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त असलेल्या गुढी पाडवा सणाला शहरातील सुवर्ण बाजारपेठेत सोने, चांदी खरेदीसाठी गर्दी उसळी होती. गुढीपाडव्याच्या दिवशी सकाळी बाजारपेठ उघडल्यार सोने आणि चांदीच्या दरात मोठी घट नोंदवली गेली. सणासुदीला दागिने खरेदीच्या विचारात असलेल्या ग्राहकांमधील उत्साहाला उधाण आले होते. इस्रायल, अमेरिका आणि इराण यांच्यातील वाढत्या तणावाचा आणि जागतिक बाजारपेठेतील अनिश्चिततेचा थेट परिणाम आता मौल्यवान धातूंच्या किमतींवर दिसून आला.**



आंतरराष्ट्रीय घडामोडींमुळे सुवर्ण बाजारपेठेत गुरुवारी सोने आणि चांदीच्या दरात मोठी घसरण नोंदवण्यात आली. यामुळे गुंतवणूकदार आणि सर्वसामान्यांचे लक्ष पुन्हा एकदा बाजारपेठेकडे वळले आहे. सुवर्ण व्यवसायातील तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार, मध्यपूर्वेतील युद्धजन्य परिस्थितीमुळे जागतिक स्तरावर डॉलरची स्थिती मजबूत होत आहे, तर दुसरीकडे शेअर बाजारात मोठे चढ-उतार पाहायला मिळत आहेत. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत सोन्या-चांदीच्या किमती नरमल्याने त्याचा सकारात्मक परिणाम देशांतर्गत बाजारपेठेवरही झाला आहे.

**जळगाव शहरातील सुवर्ण बाजारपेठेत मंगळवारी चांदीचे दर २०६० रुपयांची घट झाल्याने जीएसटीसह प्रति किलो दोन लाख ६५ हजार ७४० रुपयांपर्यंत खाली आले होते. तर बुधवारी दिवसभरात पुन्हा ३०९० रुपयांची घट झाल्याने दर जीएसटीसह प्रति किलो दोन लाख ६२ हजार ६५० रुपयांपर्यंत घसरले होते. गुढीपाडव्याच्या दिवशी गुरुवारी सकाळी बाजारपेठ उघडल्यावर आणखी तब्बल ८२४० रुपयांची घट नोंदवली गेली. त्यामुळे चांदीचे दर तीन टक्के जीएसटीसह प्रति किलो दोन लाख ५४ हजार ४१० रुपयांपर्यंत कोसळले.**

जागतिक आर्थिक परिस्थिती डळमळीत असतानाही, मौल्यवान धातुंच्या दरात झालेली घट ग्राहकांसाठी खरेदीची मोठी संधी मानली जात आहे. गुरुवारी सोन्याच्या तुलनेत चांदीच्या किमतीत लक्षणीय घट झाली आहे. व्यापाऱ्यांच्या मते, चांदीच्या औद्योगिक मागणीत झालेली घट आणि जागतिक स्तरावरील किंमत कपातीमुळे देशांतर्गत बाजारपेठेत चांदी स्वस्त झाली आहे. सलग दोन दिवस झालेल्या या घसरणीमुळे सराफा बाजारात ग्राहकांची वर्दळ कमालीची वाढली असून, लग्नसराईच्या पार्श्वभूमीवर खरेदीसाठी उत्साह दिसून येत आहे.

जळगाव शहरातील सुवर्ण बाजारपेठेत मंगळवारी ५१५ रुपयांची घट झाल्याने २४ कॅरेट सोन्याचे दर तीन टक्के जीएसटीसह प्रति १० ग्रॅम एक लाख ६० हजार ६८० रुपयांपर्यंत खाली आले होते. तर बुधवारी दिवसभरात आणखी ५१५ रुपयांची घट झाल्याने दर जीएसटीसह प्रति १० ग्रॅम एक लाख ६० हजार १६५ रुपयांपर्यंत घसरले होते. गुढीपाडव्याच्या दिवशी गुरुवारी सकाळी बाजारपेठ उघडल्यावर आणखी २९८७ रुपयांची घट नोंदवली गेली. त्यामुळे २४ कॅरेट सोन्याचे दर एक लाख ५७ हजार १७८ रुपयांपर्यंत कोसळले. त्यामुळे ग्राहकांची गर्दी उसळली होती.

## थोडक्यात

### बहिणाबाई चौधरी विद्यापीठात हठयोगावर व्याख्यान

**जळगाव ।** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रात प्राध्यापक प्रबोधिनी कार्यक्रमांतर्गत विद्यापीठाच्या योगा विभागातील लिन्टा चौधरी यांचे हठयोग या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमप्रसंगी प्रशाळेचे संचालक डॉ.म. सु.पगारे यांनी अध्यक्षस्थान भूषविले. यावेळी लिन्टा चौधरी म्हणाल्या की, आसन, प्राणायाम, मुद्रा अशा विविध माध्यमातून शरीरातील पंचेंद्रिये आणि ज्ञानेंद्रियांची शुद्धी होण्यासाठी हठयोग केला जातो. यासोबतच शरीराची शुद्धी करण्यासाठी षटकर्म देखील हठयोगात येतात. सध्याच्या आधुनिक जीवनशैलीमुळे देखील अनेक आजारामुळे योग केल्याने आपण निरोगी आयुष जगू शकतो असे त्यांनी सांगितले. यावेळी प्रा.डॉ. दीपक खरात, डॉ.भारती सोनवणे, प्रा.डॉ. सुदर्शन भवरे, कृष्णा संदानशिव, प्रतिभा गलवाडे, प्रा.डॉ.प्रीती सोनी, खेमराज पाटील, महेश सूर्यवंशी उपस्थित होते.

## रोटरी क्लबतर्फे वर्धिष्णू संस्थेला लॅपटॉप भेट; आनंदघरातील मुलांना हायजीन किटचे वितरण



प्रतिनिधी । जळगाव

**रोटरी क्लब जळगावतर्फे समाजोपयोगी उपक्रमांतर्गत वर्धिष्णू या स्वयंसेवी संस्थेला कार्यालयीन कामकाज सुलभ व्हावे, यासाठी लॅपटॉप भेट देण्यात आला. या लॅपटॉपचा उपयोग संस्थेच्या नियोजन, अहवाल तयार करणे व आर्थिक हिशेब मांडणीसाठी होणार आहे.**

या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण करण्याबरोबरच त्यांच्या आरोग्याचीही काळजी घेण्याचा प्रयत्न करण्यात आला.

**उपक्रमांतर्गत शहरातील तंट्याभील वस्तीतील आनंदघरातील विद्यार्थ्यांना हायजीन किटचे वितरण करण्यात आले. या किटमध्ये टूथब्रश, टूथपेस्ट यांसह पौष्टिक आहार म्हणून राजगिरा लाडू व चिक्कीचा समावेश होता.**

कार्यक्रमादरम्यान वर्धिष्णूच्या प्रणाली सिसोदिया यांनी संस्थेच्या कार्याची माहिती दिली. रोटरी क्लब जळगावचे अध्यक्ष गिरीश कुळकर्णी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत शिक्षण, शिस्त व स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले.

या प्रसंगी माजी अध्यक्ष संदीप शर्मा, कॅप्टन मोहन कुलकर्णी, तसेच चंदन महाजन, योगेश गांधी, डॉ. शुभदा कुलकर्णी, सुबोध सराफ, संवाद सचिव पंकज व्यवहारे आदी उपस्थित होते. उल्लेखनीय बाब म्हणजे, रोटरी क्लब जळगावने यापूर्वीही समतानगर येथील आनंदघरातील विद्यार्थ्यांसाठी संगणक भेट देऊन त्यांच्या शैक्षणिक प्रगतीस हातभार लावला आहे. हा उपक्रम रोटरीच्या मूलभूत शिक्षण व साक्षरता आणि समुदाय विकास या प्रमुख क्षेत्रांना पूरक ठरत आहे.

## पाचोरा बायपासवर भीषण अपघात; चालक जखमी

**पाचोरा –** शहरातील बायपास रोडवर आज दुपारी एका भरधाव ट्रकने इलेक्ट्रिक पोलला जोरदार धडक दिली. या अपघातात ट्रक चालक किरकोळ जखमी झाला आहे. दि. १९ मार्च रोजी दुपारी ११:३० वाजेच्या सुमारास भडगावकडून पहूरकडे जाणारा ट्रक (क्र.१९, ४६९९) पाचोरा बायपासवरून जात होता. तर विकास कॉलनीकडून एक मोटारसायकलस्वार ट्रकसमोर आला. त्याला वाचवण्याच्या प्रयत्नात ट्रक चालकाचे नियंत्रण सुटल्याने तो थेट दुभाजकावर आदळला.

## राष्ट्रीय युवा महोत्सवात फाईन आर्टमध्ये पटकावले रौप्यपदक

प्रतिनिधी । जळगाव

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा विद्यार्थी देवा सपकाळे याने सत्यभामा विद्यापीठ, चेन्नई येथे आयोजित ३९ व्या आंतरविद्यापीठ राष्ट्रीय युवा महोत्सवमध्ये फाईन आर्ट प्रकारात रौप्यपदक पटकावले. त्यांच्या या यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी कौतुक केले.**

हा युवा महोत्सव सत्यभामा विद्यापीठ, चेन्नई येथे पार पडला. देशभरातील विविध विद्यापीठांमधून सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये अत्यंत स्पर्धात्मक वातावरणात देवा सपकाळे याने आपल्या सृजनशीलतेचा आणि कलात्मकतेचा ठसा उमटवला. सातत्यपूर्ण सराव आणि मेहनतीच्या जोरावर त्याने उत्कृष्ट कामगिरी करत रौप्य पदक मिळवले.

या यशाबद्दल कुलगुरू प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील, राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, सदस्य नितीन झाल्टे तसेच विद्यार्थी विकास संचालक डॉ. चंद्रशेखर वाणी यांनीही देवा सपकाळे याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

संघ व्यवस्थापक म्हणून प्रा. डॉ. संजय शिंगाणे यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

## हिंदु जनजागृती समितीतर्फे ३० ठिकाणी सामूहिक गुढी पूजन

प्रतिनिधी । जळगाव

**हिंदु जनजागृती समिती आणि सनातन संस्थेच्या वतीने दि.१९ मार्च रोजी शहरासह जिल्ह्यात ३० ठिकाणी सामूहिक गुढी पूजन करण्यात आले.**



हिंदु जनजागृती समितीच्यावतीने जळगाव जिल्ह्यात ३० ठिकाणी सामूहिक गुढी पूजनाचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील मेहरूण भागाल श्रीराम मंदिर येथे माजी नगरसेवक प्रशांत नाईक यांच्यासह परिसरातील ५० हुन अधिक नागरिक उपस्थित होते.

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज नगर, म्हाडा कॉलनी, मेहरूण येथे दोन ठिकाणी, चौगुले प्लॉट, शिरसोली प्र.न., यशनगर पिंप्राळा, सम्राट कॉलनी, लक्ष्मीनगर, श्रीराम नगर, रामेश्वर कॉलनी, व्यंकटेशनगर, देविदास कॉलनी, खंजे, महादेव मंदिर, विखरण मधली गल्ली, विखरण खर्चि खुर्द, खर्ची बुद्रुक, पथराड, फुलपाट, यावल, डोंगरकठोरा, ओंकारेश्वर मंदिर चोपडा यासह पाळधी, आव्हानी, नांद्रा, या ठिकाणी सामूहिक गुढी पूजन करण्यात आले. यावेळी ५०० हुन अधिक धर्माभिमानी नागरिक उपस्थित होते.

## संत कबीर ज्ञान, विवेक अन् निर्गुण भक्तीचे प्रणेते : डॉ.मनोज महाजन

प्रतिनिधी । अमळनेर

**संत कबीरांनी समाजाला केवळ कोरडे तत्त्वज्ञान ऐकवले नाही तर ऐकवलेले तत्त्वज्ञान समाजामध्ये तळागाळापर्यंत रुजवण्याचा प्रयत्न केला. त्यांची भक्ती निर्गुण, निराकार, अनंत होती. त्यांनी कोणत्याही एका धर्माचा अथवा दैवताचा प्रचार प्रसार केला नाही. धर्माधर्मात भेद करण्याऐवजी ते धर्माधर्मातील पूल बनले. त्यांनी ज्ञान, विवेक आणि निर्गुण उपासनेला महत्त्व देऊन समाजाला सत्य सांगितले, असे प्रतिपादन जळगाव एम. जे. कॉलेजचे प्रा. डॉ. मनोज महाजन यांनी केले.**




अमळनेर येथील पूज्य साने गुरुजी वाचनालयात संपन्न झालेल्या मसाप शाखा अमळनेर आयोजित संत साहित्य जागर कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी अमळनेर शाखेचे अध्यक्ष संदीप घोरपडे होते. याप्रसंगी व्यासपीठावर वाचनालयाचे अध्यक्ष तथा समन्वयक दिलीप सोनवणे व साहित्यिक प्रा.बी. एन.चौधरी उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजन दीपप्रज्वलनाने न करता संत कबीरांचे भजन म्हणणाऱ्या एकतारी भजनी मंडळाने दोहे गाऊन केली. याप्रसंगी बोलताना डॉ. महाजन यांनी संत कबीर यांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांचे साहित्यिक योगदान आणि त्यांच्याबद्दल केले गेलेले आरोप याविषयी विस्तृत स्वरूपामध्ये अभ्यासपूर्ण मांडणी केली. आपल्या अध्यक्षीय भाषणात संदीप घोरपडे यांनी मनोदय व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. रमेश माने यांनी केले. परिचय, आभार प्रदर्शन कार्यवाह डॉ. विजया गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाला मसापाचे सदस्य नरेंद्र निकुंभ, गोकुळ बागूल, सुनिता पाटील, मनोहर नेरकर, वाचनालयाचे सदस्य उपस्थित होते. उद्घाटनसत्रानंतर जळगाव जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक, डॉ. दयानंद कांबळे तसेच अमृत बिऱ्हाडे यांचे व्याख्याने झाले. यावेळी क्रीडा भारतीचे जिल्हा मंत्री प्रशांत जगताप, अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे, क्रीडा संचालक डॉ. दिनेश पाटील डॉ. संजय चौधरी, जळगाव जिल्हा क्रीडा अधिकारी डॉ. सुरेश थरकुडे हे उपस्थित होते.



## जळगाव महापालिकेत प्रथमच गुढीपाडव्याचा जल्लोष

प्रतिनिधी । जळगाव

**मराठी नववर्षाचे स्वागत आणि गुढीपाडव्याचे औचित्य साधून जळगाव महापालिकेच्या इतिहासात प्रथमच दि. १९ मार्च रोजी उत्साही वातावरणात गुढी उभारण्यात आली. महापौर दीपमाला काळे यांच्या संकल्पनेतून राबवण्यात आलेल्या या उपक्रमामुळे मनपा परिसरात भक्तीमय आणि सांस्कृतिक वातावरण पाहायला मिळाले.**

गुरुवारी सकाळी १० वाजता महापालिकेच्या मुख्य प्रांगणात महापौर दीपमाला काळे यांच्या हस्ते विधीवत गुढीपूजन करण्यात आले. यावेळी पारंपारिक पद्धतीने गुढी उभारून नववर्षाचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी उपमहापौर मनोज चौधरी, स्थायी समिती सभापती डॉ. चंद्रशेखर पाटील, महिला व बालकल्याण समिती सभापती सिंधुताई कोल्हे, सभागृह नेते नितीन लड्ढा, भाजप गटनेते प्रकाश बालाणी, शिवसेना गटनेते विष्णू भंगाळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे गटनेते प्रफुल्ल देवकर आदी लोकप्रतिनिधी उपस्थित होते. गुढी उभारल्यानंतर महापौरांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन केले. तसेच मनपा प्रांगणातील लोहपुरुष सरदार वल्लभाई पटेल यांच्या पुतळ्यालाही पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले. या सोहळ्यासाठी संपूर्ण मनपा परिसर आकर्षक रांगोळ्यांनी सजवण्यात आला होता. कार्यक्रमाला नगरसेवक डॉ. विश्वनाथ खडके, ॲड. शुचिता हाडा, नितीन सपके, जयश्री पाटील, रेश्मा काळे, मंगला चौधरी, पूजा जगताप, रीटा सपकाळे, कलाबाई शिरसाळे, पियुष कोल्हे, गायत्री राणे, सुरेखा तायडे, विजय बांदल, कविता शिवदे, राजेंद्र घुगे पाटील, माधुरी बारी, निलेश तायडे, ऋतिक ढेकळे, रबियाबी खान यांसह मनपाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. गुढीपाडवा ते महानगरपालिका स्थापना दिन असा दुहेरी उत्सव जळगावकर अनुभवणार आहेत. यानिमित्त १९ ते २१ मार्च या कालावधीत मनपा इमारत आणि शहरातील मुख्य चौकांमध्ये झगमगाटी विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. मराठी संस्कृतीचे जतन करणे आणि आपल्या महापुरुषांप्रती कृतज्ञता व्यक्त करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. मनपाच्या इतिहासात हा सण पहिल्यांदाच अशा पद्धतीने साजरा होत असल्याचा आनंद असे महापौर दीपमाला काळे यांनी सांगितले.

# संसदेत जळगावच्या रेल्वे प्रश्नांची मांडणी

## रेल्वेमंत्र्यांकडे खा. स्मिता वाघ यांचा पाठपुरावा

प्रतिनिधी । अमळनेर

**जळगाव लोकसभा मतदारसंघातील प्रलंबित रेल्वे प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी खासदार स्मिता उदय वाघ यांनी लोकसभेत रेल्वे मंत्रालयाच्या २०२६-२७ च्या अनुदान मागण्यांवरील चर्चेत प्रभावी आणि ठोस मांडणी करत केंद्र सरकारचे लक्ष वेधले.**

भाषणाच्या प्रारंभी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या नेतृत्वाखाली भारतीय रेल्वे क्षेत्रात झालेल्या आमूलाग्र बदलांचे आभार मानले. सन २०१४ नंतर रेल्वे अधिक आधुनिक, सुरक्षित आणि गतिमान झाली असून महाराष्ट्राला रेल्वे प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणात निधी मिळाल्याचे त्यांनी नमूद केले. २००९-१४ च्या तुलनेत २०२६-२७ मध्ये राज्यासाठी निधीत लक्षणीय वाढ झाली असून १००% विद्युतीकरण, हजारो किलोमीटर नवीन रेल्वे मार्ग आणि अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत १३२ स्थानकांचा विकास ही उल्लेखनीय कामगिरी असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. जळगाव मतदारसंघासाठी महत्त्वाचा असलेला उधना-जळगाव रेल्वे कॉरिडॉर (७,१०० कोटी रुपये) सध्या ८०% पूर्णत्वाकडे गेला असून जुलै २०२६ पर्यंत पूर्ण होण्याची शक्यता असल्याची माहिती त्यांनी दिली. या प्रकल्पामुळे मुंबई-भुसावळ-जळगाव मार्गावरील ताण कमी होऊन प्रवास अधिक जलद आणि सुलभ होणार आहे. तसेच या मार्गावर कवच सुरक्षा प्रणाली लागू होत असल्यामुळे रेल्वे सुरक्षेत मोठी भर पडणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी लोकसभा क्षेत्रातील रेल्वे वेळापत्रकातील बदलांमुळे प्रवाशांना होत असलेल्या अडचणींचा मुद्दा ठामपणे मांडला.



सूरत-भुसावळ एक्सप्रेस (१९००५) आणि देवलाली-भुसावळ एक्सप्रेस (११११३) या गाड्यांच्या वेळेत झालेल्या बदलांमुळे विद्यार्थी, नोकरदार, व्यापारी आणि शेतकरी वर्गाला मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. या गाड्यांचे वेळापत्रक तात्काळ पूर्ववत करण्याची मागणी त्यांनी केली.

# चोपडा नगरपरिषदेचा वसुलीचा धडाका

## ३० गाळे सील तर ५० नळ कनेक्शन खंडित!; थकीत ४.५ कोटींच्या वसुलीसाठी प्रशासनाची पहाटेपासूनच कारवाई

प्रतिनिधी । चोपडा

**शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि मूलभूत सुविधांच्या पूर्ततेसाठी आवश्यक असलेल्या कर वसुलीबाबत चोपडा नगरपरिषद प्रशासन आता पूर्णपणे 'ॲक्शन मोड'वर आले आहे. काल पहाटे ६:०० वाजेपासूनच नगरपरिषदेच्या पथकाने शहरात धडक कारवाई सत्र सुरू केले आहे. त्यामुळे थकबाकीदारांचे धाबे दणाणले आहेत.**



**गाळ्यांना लावले सील; नळ कनेक्शनवर फिरली कात्री**

नगरपरिषदेने आज केलेल्या कारवाईत मोठा माळीवाडा, आठवडे बाजार (-, इ, उ विभाग), छत्रपती शाहू महाराज कॉम्प्लेक्स (आ. क्र. १०२), जुन्या पाण्याची टाकी आणि थाळनेर दरवाजा या परिसरातील तब्बल ३० गाळ्यांना सील ठोकले आहे. केवळ गाळेच नव्हे, तर पाणीपट्टी थकविणाऱ्यांविरुद्धही कठोर भूमिका घेण्यात आली आहे. आडगाव रस्ता, आदर्श नगर, औद्योगिक वसाहत (खुशबू विवेक जैस्वाल क्षेत्र) आणि आयएचडीपी ई-विंग या भागातील ५० नळ कनेक्शन खंडित करण्यात आली आहेत.

**अजूनही अनेक थकबाकीदार रडारवर**

नगरपरिषदेची शहरात एकूण ४.५ कोटी रुपयांची थकबाकी अद्याप येणे बाकी आहे. प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, अजूनही १,१०० नळ कनेक्शनधारक, ६०० निवासी मालमत्ताधारक आणि २०० गाळेधारक नगरपरिषदेच्या रडारवर आहेत.

गुढीपाडवा आणि ईद या सणांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी प्रशासनाला सणापर्यंत थांबण्याची विनंती केली आहे. सणांचा आनंद विस्कळीत होऊ नये, या सामाजिक भावनेतून प्रशासनाने सध्या कारवाईचा वेग थोडा मर्यादित ठेवला आहे.

मात्र, ही सवलत केवळ २२ मार्चपर्यंतच असेल. त्यानंतर कोणतीही पूर्वसूचना किंवा सवलत न देता ही मोहीम अत्यंत तीव्र स्वरूपात राबवली जाणार आहे.

### ➤ बिल मिळाले नाही ही सबब चालणार नाही!

प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, मालमत्ता कर आणि पाणीपट्टी भरण्याची अंतिम मुदत ३१ डिसेंबरपर्यंत असते. मुदत संपल्यानंतर आता दरमहा २% दराने व्याज आकारणी केली जात आहे. अनेक नागरिक आम्हाला बिल मिळाले नाही, असे कारण देऊन कर भरण्यास टाळाटाळ करतात, परंतु प्रशासनाने आता ही सबब ऐकून न घेण्याचे ठरवले आहे. स्वतःहून नगरपरिषदेत येऊन कर भरणा करणे ही प्रत्येक मालमत्ताधारकाची कायदेशीर जबाबदारी आहे. बिले वाटप ही केवळ एक प्रक्रिया आहे, परंतु बिल मिळाले नाही तरी कर भरण्याच्या जबाबदारीतून नागरिकांची मुक्तता होत नाही.

### ➤ २२ मार्चनंतर कठोर कारवाई : मुख्याधिकारी

**नगरपरिषदेच्या माध्यमातून रस्ते, स्वच्छता आणि पाणीपुरवठा या सेवा सुरळीत ठेवण्यासाठी वेळेवर कर भरणे आवश्यक आहे. ३१ डिसेंबर ही मुदत संपल्यामुळे आता व्याजासह वसुली सुरू आहे. बिल मिळाले नाही ही सबब यापुढे ग्राह्य धरली जाणार नाही; नागरिकांनी स्वतःहून कार्यालयात येऊन आपला कर भरावा, ही त्यांची जबाबदारी आहे. २२ मार्चनंतर थकबाकीदारांवर कोणतीही कठोर कारवाई केली जाईल, असे मुख्याधिकारी रामनिवास झंवर यांनी स्पष्ट केले आहे.**

## २२ मार्च २०२६ नंतर मोहिमेचा विळखा अधिक घट्ट होणार

### ➤ मुख्य ठळक मुद्दे

- वेळ: पहाटे ६:०० वाजेपासून धडक कारवाई.
- कारवाई: ३० गाळे सील, ५० नळ कनेक्शन कट.
- नियम: ३१ डिसेंबर ही अंतिम मुदत; त्यानंतर दरमहा २% व्याज.
- जबाबदारी: बिल मिळाले नसले तरी स्वतःहून कर भरणे बंधनकारक.
- अंतिम इशारा: २२ मार्चनंतर मोहिमेचा दुसरा टप्पा अधिक तीव्र होणार.

# चोपड्यात २३.६३ कोटींची फसवणूक करणाऱ्या

## १३ सीएससी केंद्र चालकांवर गुन्हा दाखल

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यात जवळपास १३ सीएससी सेंटरमध्ये बनावट कागदपत्रांच्या आधारे आंबिया बहार विमा योजनेत प्रचंड घोळ करून शासनाची जवळपास २३ कोटी ६३ लाख रुपयांची लूट केल्याप्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल झाल्याने शेतकरी वर्गात खळबळ उडाली आहे.**

या गंभीर प्रकरणात कोणा कोणाचा हात आहे हे लवकरच समोर येणार असून अनेक मातब्बर पोलिसांच्या जाळ्यात अडकण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. याप्रकरणी चोपडा शहर पोलिसात नऊ ,चोपडा ग्रामीण पोलिसात एक तर अडावद ग्रामीण पोलिसात ३ केंद्र चालकांवर गुन्हा दाखल करण्यात आली आहे.

गेल्या वर्षी चोपडा तालुक्यात विमा कंपनीतर्फे केळीसाठी अंबिया बाहर विमा योजना राबविण्यात आली होती. या योजनेत शेतकऱ्यांतर्फे सहभाग नोंदवला जातो. पीक विम्याचा अर्ज सीएससी सेंटर मार्फत पीक विमा कंपनीकडे सादर केला जातो. मात्र एमआरएस प्रणालीने केलेल्या पडताळणीत चोपडा तालुक्यातील केळी पीक आढळून आलेले नाही. त्यामुळे या क्षेत्रावरील पीक विमा जास्तीचा आढळून आला आहे. अमोल भास्कर पाटील चोपडा, सुदर्शन वासुदेव पाटील चोपडा, नितीन भागवत माळी चोपडा, जितेंद्र गुरुदास शिंपी चोपडा, घनश्याम अशोक भोई चोपडा, पंकज नागेशराव सोनवणे चोपडा, मनोज मुरलीधर पाटील चोपडा, विनोद सुरेश जव्हागे चोपडा, अविनाश विष्णू पाटील चुंचाळे, या सीएससी सेंटर चालकांनी शासनाचा विश्वासघात करून फसवणूक केल्यामुळे त्यांच्याविरुद्ध चोपडा शहर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. शहर पोलीस ठाणे हद्दीतील ९ सीएससी केंद्र चालकांनी दि.१ ते ३१ ऑक्टोबर २०२५ पावेतो चोपडा शहरातील तसेच चुंचाळे गावातील केंद्रात शेतकऱ्याचे केळी पीक नसतांना पीकविम्यांचे बनावट कागदपत्र बनवून ती खरी आहे, असे भासवून शासनाचे १३ कोटी ४४ लाख ६२ हजार ७२४ रुपये व केंद्र शासनाची १० कोटी १८ लाख ६५ हजार ७०० असे एकूण २३ कोटी ६३ लाख २८ हजार ४२४ रुपये रक्कमेची शासनाची फसवणूक करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील क्षेत्रावर केळीची लागवड नसताना खोटे ७/१२ उतारे जोडून सीएससी सेंटर चालकांनी पीक विमा काढल्याचे शासकीय तपासणी व पडताळणीत आढळून झाले आहे.

**चोपडा ग्रामीण पोलिसात एका केंद्र चालकावर गुन्हा दाखल**

चोपडा ग्रामीण पोलिसात कृषी अधिकारी दीपक भास्करराव साळुंखे यांच्या फिर्यादीवरून तावसे बुद्रुक येथील प्रतिभा मच्छिंद्र चौधरी यांचे नावे असलेले सीएससी केंद्राविरुद्ध राज्य शासनाचे ९१,७९,९२३.५० रुपयांचे तर केंद्र शासनाचे ६९,५४,४८७.५० रुपये असे एकूण १,६१,३४,४११ रकमेची फसवणूकीचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पुढील तपास संबंधित पोलिस ठाण्याचे पोलिस अधिकारी करीत आहेत.

### ➤ अडावद येथे तिघांवर गुन्हा

**अडावद पोलीस स्टेशन हद्दीतील वर्डी येथील गुलाब आधार पाटील, अडावद येथील किरण शिवाजी पाटील व चेतन विकास पाटील यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे . यात तिघं केंद्रात राज्य शासनाचे २,८८,३०,३५१ रुपये व तर केंद्र शासनाचे २,१८,४१,१७५ रुपये असे तिन्ही केंद्र म्हणून ५,०६,७१,५२६ इतक्या रकमेची शासनाची फसवणूक करण्याच्या प्रयत्न करण्यात आला आहे. याबाबत अडावद पोलिसात तिन्ही केंद्र चालकांवर गुन्हा नोंदविण्यात आला आहे.**

## देवा सपकाळेला क्ले मॉडेलिंगमध्ये रौप्य पदक

प्रतिनिधी । जळगाव

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठीचा विद्यार्थी देवा सपकाळे याने सत्यभामा विद्यापीठ, चेन्नई येथे आयोजित ३९ व्या आंतरविद्यापीठ राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये फाईन आर्ट (क्ले मॉडेलिंग) प्रकारात रौप्य पदक पटकावले आहे. त्यांच्या या यशाबद्दल कुलगुरू माहेश्वरी यांनी कौतुक करत शुभेच्छा दिल्या आहेत. हा युवा महोत्सव सत्यभामा विद्यापीठ, चेन्नई येथे पार पडला.

# भुसावळ तहसील कार्यालयात जागतिक ग्राहक दिन उत्साहात साजरा

प्रतिनिधी । भुसावळ

जागतिक ग्राहक दिनानिमित्त तहसील कार्यालयातील सभागृहात ग्राहक जागृती दिन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमात ग्राहकांच्या हक्कांविषयी जनजागृती करण्यासाठी विविध मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण किरणकुमार बोलके यांचे हस्ते झाले. ग्राहक पंचायत महाराष्ट्र पदाधिकारी यांचे स्वागत रोशना रेवतकर यांनी केले. कार्यक्रमास तहसीलदार नीता लबडे यांनी आयोजनाबाबत मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या. यावेळी पुरवठा निरीक्षण अधिकारी रोशना रेवतकर, निवासी नायब तहसीलदार शोभा पुले, नायब तहसीलदार प्रीती लुटे, नायब तहसीलदार पूजा अवघडे यांची उपस्थिती लाभली.




प्रसंगी ग्राहक पंचायत महाराष्ट्र या संस्थेच्या प्रबोधनात्मक कॅलेंडरचे उद्घाटन प्रमुख पाहुणे प्रमोद लोणे (सेवानिवृत्त पीएसआय, भुसावळ शहर वाहतूक शाखा) यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ग्राहक पंचायत महाराष्ट्र यांचे 'जागो ग्राहक आगो' वतीने निलेश देशमुख यांनी ऑनलाईन खरेदी करताना होणारी फसवणूक कशी टाळता येईल, यासाठी घ्यावयाची काळजीबाबत तसेच या वर्षांची प्रबोधन थीम सुरक्षित उत्पादने व आत्मविश्वासू ग्राहकाबाबत ग्राहकांचे हक्क माहिती दिली.

# पंकज माध्यमिक विद्यालयात सांस्कृतिक मूल्यांची जोपासना

## चोपडा येथे मराठी वर्षानिमित्त गुढीपाडवा उत्साहात साजरा

प्रतिनिधी । चोपडा

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी २०२०) अंतर्गत भारतीय संस्कृती, परंपरा आणि मूल्यांच्या शिक्षणावर विशेष भर दिला जात आहे. याच धोरणाचा वारसा जपत, पंकज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात मराठी नववर्ष व गुढीपाडवा सण मोठ्या उत्साहात आणि आनंददायी वातावरणात साजरा करण्यात आला.



कार्यक्रमाची सुरुवात इयत्ता ५ वी ते ८ वी च्या प्रत्येक वर्गाबाहेर पारंपरिक गुढी उभारून व विधिवत पूजन करून करण्यात आली. विद्यार्थ्यांनी भारतीय संस्कृतीनुसार गुढीला नैवेद्य अर्पण केला. विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान न घेता अनुभवात्मक शिक्षणाचा भाग म्हणून पारंपरिक वेशभूषा परिधान केली होती आणि विद्यार्थिनींनी आकर्षक रांगोळ्या काढून आपल्या कलागुणांचे प्रदर्शन केले.

एनईपी २०२० नुसार विद्यार्थ्यांमधील नेतृत्वगुण विकसित करण्यासाठी कार्यक्रमाचे संपूर्ण सूत्रसंचालन पंकजा केशरलाल पाटील व देवयानी चंद्रकांत पाटील या विद्यार्थिनींनी अतिशय कौशल्याने केले. लोकेश पाटील याने सणाचे महत्त्व विशद केले, तर विजया पाटील यांनी गुढीपाडव्याचा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा विद्यार्थ्यांना उलगडून सांगितला. बाजीराव तायडे सरांच्या सुमधुर गीताने आणि इयत्ता ८ वीच्या विद्यार्थिनींच्या पारंपरिक नृत्याने कार्यक्रमात अधिक रंगत आणली. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. पाटील सर यांनी प्रभू श्रीरामांच्या प्रतिमेचे पूजन केले. आपल्या मार्गदर्शनात ते म्हणाले की, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आपल्या गौरवशाली संस्कृतीची जपणूक होते आणि त्यांच्यात नैतिक मूल्यांची रुजवणूक होते, जे नवीन शैक्षणिक धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. याप्रसंगी वैशाली पाटील , जयेश मंडपे , पौर्णिमा भादले, दीपक सोनवणे , एम. पी. पाटील यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या उपक्रमाचे संस्था अध्यक्ष पंकज बोरोले, संस्थापक अध्यक्ष डॉ. सुरेश पंडित बोरोले, उपाध्यक्ष अविनाश राणे, सचिव गोकुळ भोळे, संचालक नारायण बोरोले व सर्व संचालक मंडळाने कौतुक केले.

# वरणगावला छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मूक पदयात्रा

## तरुण मुलांसह मुलींची मोठ्याप्रमाणात उपस्थिती; श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानतर्फे आयोजन

प्रतिनिधी । वरणगाव

येथील श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान शाखेच्या वतीने १८ मार्च बुधवार रोजी सायंकाळी जुन्या नगरपरिषद जवळील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथून मूक पदयात्रा काढण्यात आली. मिरवणूक मार्गाने संपूर्ण गावात फिरून गांधी चौक येथे समारोप करण्यात आला.



या मूक पदयात्रेत गावातील मोठ्या संख्येने तरुण व तरुणी या मूक पदयात्रेत सहभागी झाले होते. गेल्या १८ फेब्रुवारी पासून बलिदान मास पाळण्यात आला होता. बलिदान मासात तरुणांमधील नैराश्य कमी करणे व व्यसनमुक्त करण्याचा उद्देश यावर्षी बलिदान मासानिमित्त तरुणांनी ठेवला होता.

दररोज महिनाभर रात्री ८ वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाजवळ धर्मवीर संभाजी महाराज यांचे सूर्यह्रदय श्लोक व्हायचे

औरंगजेबाने संभाजी महाराजांना ४० दिवस कैदेत ठेवले होते. त्याचा निषेध व महाराजांच्या धैर्याचे समर्थन म्हणून १८ मार्च बलिदान दिवस पाळला जातो. छत्रपती संभाजी महाराजांच्या पुण्यतिथी पूर्वी चाळीस दिवसांचा कालावधीत हा बलिदान मास म्हणून पाळला जातो. या कालावधीत दररोज ८ वाजता छत्रपती धर्मवीर संभाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून श्री संभाजी सूर्यह्रदय श्लोक म्हणतात. दररोज रात्री ८ वाजेला छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर शंभरावर तरुण, तरुणी दररोज रात्री सहभागी होत होते.

# विचखेडा येथे २० ते २७ मार्च दरम्यान अखंड हरिनाम कीर्तन सप्ताह

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील विचखेडा येथे समस्त ग्रामस्थ व भजनी मंडळाच्या वतीने १८ व्या अखंड हरिनाम कीर्तन सप्ताहाचे दि. २० ते २७ मार्च दरम्यान भव्य आयोजन करण्यात आले आहे.**

संत-साधूंच्या आशीर्वादाने तसेच वै. ह.भ.प. विठ्ठल महाराज चौधरी (मोठे बाबा), कै. ह.भ.प. उत्तमराव पंडीत पाटील व कै. ह.भ.प. सिताराम आत्माराम पाटील यांच्या प्रेरणेने हा सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. सदरील सप्ताह काळात दररोज पहाटे ५ ते ७ काकडा आरती, सायंकाळी ५ ते ७ हरिपाठ आणि रात्री ८.३० ते १०.३० या वेळेत कीर्तन सेवा आयोजित करण्यात आली आहे. कीर्तनकारांची रूपरेषा अशी, दि. २० मार्च - ह.भ.प. रमेश महाराज (सुसरीकर), दि. २१ रोजी ह.भ.प. रवि महाराज, दि. २२ रोजी ह.भ.प. राम महाराज (भोणेकर), दि. २३ रोजी ह.भ.प. रविंद्र महाराज, दि. २४ रोजी ह.भ.प. सुशिल महाराज (विटनेरकर), दि. २५ रोजी ह.भ.प. मोहन महाराज (वाघळूदकर), दि. २६ रोजी ह.भ.प. राजेंद्र महाराज (पिंपळकोठेकर), दि. २७ रोजी ह.भ.प. राजेंद्र महाराज (पिंपळकोठेकर) विशेष कार्यक्रम - दि. २६ रोजी सायंकाळी ४ ते ६ या वेळेत भव्य दिंडी व कळस यात्रा काढण्यात येणार आहे.